
# विद्यापीठातर्फे आजपासून ट्विटर परिषद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

न्यू कॉलेज, दादा पाटील महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने दि. १३ ते १५ एप्रिल दरम्यान नॅनो बायो विषयावरील देशातील दुसऱ्या आंतरराष्ट्रीय ट्विटर परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.



कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र शासनाच्या वर्क फ्रॉम होम आवाहनाला प्रतिसाद म्हणून या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेमध्ये नॅनो तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान आणि कोरोना विषाणूला नियंत्रित करण्याच्या विषयावर पोस्टरच्या माध्यमातून सादरीकरण होणार आहे. या परिषदेत प्रत्यक्ष भेटीगाठी ऐवजी घरात बसून सहभागी होता येणार आहे. २१ दिवसांच्या लॉकडाऊन काळातील देशातील ही एकमेव परिषद आहे. या परिषदेमध्ये आत्तापर्यंत जगभरातून १७५ हून अधिक संशोधकांनी सहभाग नोंदवला असून या परिषदेचे उदघाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू देवानंद शिंदे यांच्या हस्ते ऑनलाईन करण्यात येणार आहे.

# डॉ. पळसे यांची नियुक्ती कायदेशीरच

## शिवाजी विद्यापीठ प्रशासनाची ग्वाही

**कोल्हापूर, ता. १२ :** शिवाजी विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक यांची नियुक्ती महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ व विद्यापीठ प्रमाणसंहिता यातील विद्यापीठ अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबतच्या तरतुदीनुसारच केली गेली आहे. याबाबत राज्यपाल कार्यालयाकडे योग्य ती माहिती पाठवण्यात आली आहे, अशी ग्वाही शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे. याबाबतचे पत्रक त्यांनी जाहीर केले आहे.

परीक्षा नियंत्रक डॉ. गजानन पळसे यांची नियुक्ती बेकायदेशीर आहे. तरीदेखील त्यांनी पदवी प्रदान सोहळ्यात विद्यार्थ्यांना पदवी प्रदान केली, असा आरोप राजर्षी शाहू सेना यांनी केला. तसेच याबाबत राज्यपालांकडे तक्रार केली. राज्यपाल कार्यालयाने याबाबतची माहिती शिवाजी विद्यापीठ प्रशासनाकडे मागवली. प्रशासनाने त्यांनी मागितलेली माहिती दिली; मात्र ही माहिती खोटी असल्याचा आरोप शाहू सेनेने केला. याबाबत शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने खुलासा केला असून त्यांनी संघटनेने केलेले आरोप फेटाळले आहेत. विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकातील माहितीनुसार, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ व विद्यापीठ प्रमाणसंहिता यामधील विद्यापीठ अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबतच्या तरतुदीनुसार नियुक्ती केली गेली आहे.



कोरोना संकटामुळे शिक्षण क्षेत्रात वेगाने बदल होतील. भविष्यात ऑनलाईन अध्यापन आणि अध्ययन मोठ्या प्रमाणात होईल, मात्र त्यासाठी आवश्यक ती साधने सार्वत्रिक झाली पाहिजेत. कारण समाजातील सर्व घटकांना शिक्षण घेता आले पाहिजे, ही विद्यापीठांची भूमिका आहे. 'सकाळ'च्या विशेष संपादकीयमध्ये भविष्यातील आर्थिक संकटाचा घेतलेला वेध या बदलांच्या दृष्टीनेही महत्त्वाचा वाटतो. कोरोनाच्या काळात माणूस जगला पाहिजे, ही प्राथमिकता व्यवस्थेची आहे. ती योग्यही आहे; पण जगण्याची साधनेही तितकीच महत्त्वाची आहेत. त्यामुळे शासनाने लॉकडाऊनचा कालावधी ठरवताना नागरिकांची सुरक्षितता आणि अर्थव्यवस्था या दोन्हीचा विचार करणे आवश्यक आहे.

– प्रा. डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

# पंचगंगा खोऱ्यातील घेतले पाण्याचे नमुने

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

## नद्यांचे प्रदूषण घटल्याने होणार विश्लेषण

लॉकडाउनमुळे पंचगंगा नदी स्वच्छ झाली असल्याचे दिसत असल्याने नेमके कोणते प्रदूषण थांबले व त्याचा परिणाम कसा झाला हे जाणून घेण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या आदेशानुसार पंचगंगा खोऱ्यातील विविध नद्यांचे १३ ठिकाणचे पाण्याचे नमुने घेण्यात आले. यानंतरही दोन वेळा नमुने घेतले जाणार आहेत. त्या सर्वांचा अभ्यास करून विश्लेषण केले जाणार आहे.

संचारबंदीमुळे नागरिकांना अत्यावश्यक कारणांशिवाय घराबाहेर पडू दिले जात नाही. त्यामुळे वेगवेगळ्या ठिकाणचा नागरिकांचा वावर बंद झाला आहे. पंचगंगा नदीही अशाच ठिकाणांमधील एक ठिकाण असून त्यामुळे नदीच्या पात्रातील पाणी स्वच्छ झाले असून कचऱ्याचा ठावठिकाणा नसल्याचे चित्र आहे. याबाबत पालकमंत्री सतेज पाटील यांनी खरोखरच नदी स्वच्छ झाली असल्यास त्याची नेमकी काय कारणे आहेत हे तपासण्यासाठी अभ्यास करण्याचे आदेश दिले. या अभ्यासातून प्रदूषण कमी करणारे घटक समोर आल्यास त्यानुसार पुढेही कार्यवाही सुरू ठेवून पंचगंगा नदी स्वच्छ ठेवण्याचे काम करता येईल, असे जिल्हा प्रशासनाचे मत आहे. त्यानुसार आसुर्ले पोर्लेजवळ कासारी नदीतील, खडक कोगे येथे कुंभी नदीतील, तुळशी नदीतील बहिरेश्वर येथे, भोगावती नदीतील हळदी येथे, प्रयाग चिखली, पंचगंगा घाट, शिरोली पूल, सुर्वे, रुई, इचलकरंजी, तेरवाड व शिरोळ बंधारा येथील पाण्याचे नमुने घेण्यात आले आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, शिवाजी विद्यापीठाचा पर्यावरण विभाग व पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड यांच्या माध्यमातून ही मोहीम राबवण्यात आली. या नमुन्यांची तपासणी विद्यापीठामध्ये करण्यात येणार आहे.

# समिती अहवालानंतर परीक्षांचा निर्णय

कोल्हापूर : संचारबंदीचा कालावधी ३० एप्रिलपर्यंत राज्य सरकारने वाढवण्याचा निर्णय घेतल्याने शिवाजी विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर परीक्षांच्या नियोजनाबाबत अद्याप कोणताही निर्णय घेतला जाणार नाही, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे यांनी दिली. सहा सदस्यीय समिती परीक्षा घेण्याबाबत अभ्यास करून अहवाल सादर करेल व त्यानंतरच राज्यातील सर्व विद्यापीठांनी परीक्षांचे नियोजन व नवे वेळापत्रक तयार करावे, अशा स्पष्ट सूचना राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिल्या आहेत.

# विविध ४०० वनस्पती त्यांच्या निगराणीखाली

## » संचारबंदीतले दिवस  डॉ. एस. आर. यादव यांचा दिवस जातो वनस्पतींच्या सहवासात

**डॉ. एस. आर. यादव यांचा वनस्पतीशास्त्रात बोलबाला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्राचे ते माजी विभागप्रमुख. वनस्पतीशास्त्रात 'माईलस्टोन' काम करणारे व्यक्तिमत्त्व. 'आपोनोजेटॉन' वनस्पतीतलं त्यांचं काम मानलं जातं. ३० वर्षे त्याचा त्यांनी सखोल अभ्यास केला. विद्यापीठातील लीड बोटॅनिकल गार्डन साकारण्यात त्यांचं योगदान महत्त्वाचं ठरलं. केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयातर्फे त्यांचा इके जानकी अमल जीवनगौरव पुरस्काराने सन्मान झाला आहे. त्यांच्या कर्तृत्वाची दिशा पुरस्कारातून लक्षात येते. निवृत्तीनंतरच्या आयुष्यात त्यांचं 'रिसर्च वर्क' सुरूच आहे. वनस्पतींच्या सहवासातच त्यांचा दिवस उजाडतो. संचारबंदीतला वेळ तोलून मोलून वापरण्यात त्यांचा दिवस सरतोय.**

**– संदीप खांडेकर**

डॉ. यादव कऱ्हाड तालुक्यातील साईकडेचे. मुंबईतील रुईया महाविद्यालय, गोवा विद्यापीठ, दिल्ली विद्यापीठात त्यांचा अध्यापनासाठी संचार होता. शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी, इथल्या विद्यार्थ्यांना घडविण्याचे त्यांचे स्वप्न होते. त्यात त्यांनी कसर ठेवली नाही. शाहू नाक्यावर त्यांचं घर आहे. जंगली वनस्पतींची छोटी बाग त्यांच्या अंगणात आहे. नष्ट होण्याच्या मार्गावरील वनस्पतींचे जतन ते करतात. सुमारे ४०० वनस्पती त्यांच्या निगराणीखाली आहेत. सकाळी उठल्यावर त्यांना पाणी घालूनच सरांच्या दिवसाचा श्रीगणेशा सुरू होतो.

पॅन्क्रेशियम व पामच्या विविध जाती अंगणात आहेत. वनस्पतींच्या अभ्यासात त्यांची भटकंती थांबलेली नाही. ३५ वर्षांतील वनस्पतींच्या छायाचित्रांचा खजिना सरांकडे आहे. अध्यापनाच्या आणि संशोधनाच्या कामात त्यांच्या वर्गीकरणाचे गणित त्यांना सुटले नव्हते. फुलवर्गीय वनस्पतींचे वर्गीकरण करून सचित्र पुस्तिका लिहिण्याचा विचार त्यांच्या डोक्यात आहे. नेमकेपणाने संशोधनाच्या दिशा सांगण्याची जबाबदारी सरांवर आहे. एक-दोन विद्यार्थ्यांशी कम्युनिकेशन त्यांचे ठरलेले आहे. युवल नोहाहरारीचे 'सेपियन्स : ए ब्रीफ हिस्ट्री ऑफ ह्युमनकाइंड,' '२१लेसन्स फॉर २१ सेंच्युरी,' 'होमोडियूस ए ब्रीफ हिस्ट्री ऑफ टुमारो' व शेरॉन मोअलेमचे सर्व्हायव्हल ऑफ दि सिकेस्ट : ए म मेडिकल डिस्कव्हरर्स व्हाय वुई नीड डिसीज' पुस्तकांचे वाचन ते करत आहेत. आकाशवाणीवरील गीतरामायण ऐकतात. त्यांच्या ग्रंथालयात एक हजारावर पुस्तके आहेत.

४६ देशांतील वनस्पतींच्या सायंटिफिक नावात बदल झालाय. त्याचा अभ्यास ते करतात. नॅशनल व इंटरनॅशनल जर्नल्सकडून येणाऱ्या शोधनिबंधांचे पोस्टमार्टम करण्याचे कामही त्यांच्याकडे आहे. संशोधनपर लेख लिहिण्याचे काम त्यांच्यात थांबलेलं नाही. टीव्हीवरील बातम्या पाहतात. महाभारत व डीएनएवरील विश्लेषण पाहिल्याखेरीज ते अंथरुणावर अंग टाकत नाहीत.



**विविध वनस्पतींच्या देखभालीत व्यस्त असताना डॉ. एस. आर. यादव.**

# डॉ. आंबेडकर यांची जयंती घरातूनच साजरी करा

## डॉ. आंबेडकर विकास केंद्राचे डॉ. महाजन यांचे आवाहन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जगभर साजरी केली जाते. यावर्षी जग कोरोनाच्या साथीची लढाई लढत असताना लॉकडाऊन करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर सर्वांनी बाबासाहेबांची जयंती घरामध्येच साजरी करून सार्वजनिक हित जोपासावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करताना घरात प्रतिमापूजन करणे, बाबासाहेबांच्या ग्रंथांचे किंवा त्यांच्यावर इतरांनी लिहिलेल्या ग्रंथांचे वाचन करावे. त्यांच्या बहुआयामी कार्यावर चर्चा करणे, आजच्या आधुनिक युगात मार्गदर्शक ठरणारे त्यांचे विचार कागदावर लिहून काढणे, त्रिशरण व पंचशील, अष्टांग मार्ग व दहा परिमिता यांचे मराठीत भाषांतर करावे. फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचार व कार्यावर विद्यार्थ्यांनी निबंध लिहावेत, भाषण करावे, असे घरगुती उपक्रम राबवावेत.

लोकमत

# 'न्यू' तर्फे ट्विटर परिषदेचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : नॅनो बायो विषयावरील भारतातील दुसऱ्या आंतरराष्ट्रीय ट्विटर परिषदेचे आयोजन कोल्हापूरमधील न्यू कॉलेज, शिवाजी विद्यापीठ आणि कर्जत येथील दादा पाटील महाविद्यालयातर्फे केले आहे. दि. १३ ते १५ एप्रिल दरम्यान ही परिषद होणार आहे. वर्क फ्रॉम होम आवाहनाला प्रतिसाद म्हणून ही परिषद आयोजित केली आहे. त्यामध्ये विविध विषयांवर पोस्टरच्या माध्यमातून सादरीकरण होणार आहे. ही परिषद ऑनलाईन असल्याने घरबसल्या त्यामध्ये सहभागी होता येणार आहे. या परिषदेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. या परिषदेमध्ये जास्तीत जास्त संशोधकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले आहे.

Kolhapur Main
Page No. 10 Apr 13, 2020
Powered by: erelego.com

# विद्यापीठातर्फे आज दुसरी आंतरराष्ट्रीय ट्विटर परिषद

**कोल्हापूर :** नॅनो बायो विषयावरील भारतातील दुसऱ्या आंतरराष्ट्रीय ट्विटर परिषदेचे आयोजन न्यू कॉलेज, दादा पाटील महाविद्यालय कर्जत आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. १३ ते १५ एप्रिल या दरम्यान ही परिषद होणार आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ऑनलाईन पध्दतीने होणार आहे. या परिषदेमध्ये नॅनो तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान आणि करोना विषाणूला नियंत्रित करण्याच्या विषयावर पोस्टरच्या माध्यमातून सादरीकरण होणार आहे. २१ दिवसाच्या लॉकडाऊनच्या काळातील भारतातील ही एकमेव परिषद आहे. या परिषदेमध्ये आत्तापर्यंत जगभरातून १७५ च्या वर संशोधकांनी सहभाग नोंदवला आहे. या ट्विटर परिषदेमध्ये जास्तीत जास्त संशोधकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन परिषदेचे समन्वयक डॉ. मानसिंगराज निंबाळकर यांनी केले आहे.

# आंतरराष्ट्रीय ट्विटर परिषद आजपासून

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

न्यू कॉलेज, दादा पाटील महाविद्यालय कर्जत व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ ते १५ एप्रिलदरम्यान नॅनो - बायो विषयावरील भारतातील दुसऱ्या आंतरराष्ट्रीय ट्विटर परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली व महाराष्ट्र शासनाच्या वर्क फ्रॉम होम आवाहनाला प्रतिसाद म्हणून परिषदेचे आयोजन केले आहे. परिषदेचे उद्घाटन कुलगुरू देवानंद शिंदे यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने होईल. नॅनो तंत्रज्ञान, बायो तंत्रज्ञान व कोरोना विषाणूला नियंत्रित करण्याच्या विषयावर पोस्टरच्या माध्यमातून सादरीकरण होणार आहे. ही परिषद ऑनलाईन असल्याने घरात बसून सहभागी होता येणार आहे. परिषदेत जगभरातून १७५ संशोधकांनी सहभाग नोंदवला आहे. जास्तीतजास्त संशोधकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन परिषदेचे समन्वयक डॉ. मानसिंगराज निंबाळकर यांनी केले आहे.

# ‘एनएसएस’ची फौज प्रशासनाच्या साथीला!

## कोरोनावर मात करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील २८ हजार स्वयंसेवकांचा समावेश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शिवाजी विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील सुमारे २८ हजार स्वयंसेवक नागरिकांच्या सेवेसाठी व प्रशासनाच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदतीसाठी तत्पर झाले आहेत.

मानवनिर्मित किंवा नैसर्गिक संकटाच्या काळात शिवाजी विद्यापीठ पूर्ण क्षमतेने पुढाकार घेऊन त्या संकटावर मात करण्यासाठी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून काम करते. कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता विद्यापीठाच्या वसतिगृहात १००० बेडचे आयसोलेशन केंद्र तात्पुरत्या स्वरूपात सुरू केले जात आहे. सध्याच्या संकट काळात विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांमधील व राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना यांच्या स्वयंसेवक व स्वयंसेविकांवर कोरोनाविरुद्धच्या लढाईत सहभागी होण्याची जबाबदारी पार पाडत आहेत.

‘एनएसएस’चे सुमारे २८ हजार स्वयंसेवक फेसबुक, व्हॉटस् ॲप यासह इतर सोशल मीडियाचा वापर करत ५० लाखांहून अधिक लोकांपर्यंत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पद्धतीने पोहोचत आहेत. नागरिकांच्या कौटुंबिक अडीअडचणींची माहिती घेऊन अनेक वेळा स्वतः तर काही वेळा प्रशासनाच्या माध्यमातून त्यांना मदत करत आहेत. गरजू, फिरस्ते, गावोगावचे असहाय ज्येष्ठ नागरिक, अनाथ, दिव्यांग लोकांच्या मदतीला जात आहेत. लोकांना सॅनिटायझर्स, मास्क यांचे वितरण, किराणा, भाजीपाला, औषधे व इतर जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा आदी महत्त्वाची कामे ‘एनएसएस’चे स्वयंसेवक करत आहेत. सद्यस्थितीत कोरोनाबाधित रुग्णांची संख्या वाढत आहे. या पार्श्वभूमीवर राज्य व जिल्हा प्रशासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले सोशल डिस्टन्सिंगसह मास्क वापरणे, साबणाने हात धुणे आदी दक्षता व्यक्तिगत व कौटुंबिक स्तरावर स्वयंसेवकांनी घ्याव्यात, अशा सूचना विद्यापीठाने केल्या आहेत.

### पालकांच्या परवानगीने नोंदणी

सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यांत प्रशासनाच्या मदतीसाठी हेल्पलाईनमध्ये काम करण्यासाठी इच्छुक स्वयंसेवकांची पालकांच्या परवानगीने नोंदणी सुरू आहे. यासाठी स्वतंत्र गुगल रजिस्ट्रेशन फॉर्म तयार केला आहे. त्याद्वारे स्वयंसेवकांनी नोंदणी करावी. राष्ट्रीय आपत्तीच्या वेळी सहभाग नोंदवावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिंदे यांनी केले आहे.

# विद्यापीठात आजपासून ऑनलाइन परिषद

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात १३ ते १५ एप्रिलदरम्यान नॅनो बायो विषयावरील भारतातील दुसऱ्या आंतरराष्ट्रीय ट्विटर परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. न्यू कॉलेज, दादा पाटील महाविद्यालय, कर्जत आणि शिवाजी विद्यापीठच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद होणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोग तसेच महाराष्ट्र सरकारच्या वर्क फ्रॉम होम आवाहनाला प्रतिसाद म्हणून या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेमध्ये नॅनो तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान आणि करोना विषाणूला नियंत्रित करण्याच्या विषयावर पोस्टरच्या माध्यमातून सादरीकरण होणार आहे.



# सायबर सिक्युरिटी ऑनलाइन कार्यशाळा



डॉ. आर. के. कामत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित सायबर सिक्युरिटी विषयक एक दिवसीय ऑनलाइन राष्ट्रीय कार्यशाळेत देशभरातून ६१ प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्‌घाटन झाले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. आर. के. कामत आदी उपस्थित होते.

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या पंडित मदनमोहन मालवीय शिक्षक व शिक्षणविषयक राष्ट्रीय अभियानांतर्गत शिवाजी विद्यापीठात कार्यरत सायबर सिक्युरिटी व डाटा सायन्सेस फॅकल्टी डेव्हलपमेंट केंद्रातर्फे ही ऑनलाइन कार्यशाळा झाली. डॉ. आर. के. कामत यांनी मार्गदर्शन केले कार्यशाळेत इन्ट्रोडक्शन टू सायबर सिक्युरिटी, सायबर ॲटॅक्स क्लासिफिकेशन आणि स्मार्टफोन अँड पेमेंट सिक्युरिटी या विषयांवर ख्यातनाम तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.